# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date: 07 April 2025**

**Time: 7.10 to 7.20 AM**

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०७ एप्रिल २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- पंतप्रधानांच्या हस्ते रामेश्वरम इथं देशातल्या पहिल्या व्हर्टीकल लिफ्ट रेल्वे पुलाचं उद्घाटन
- गेल्या आठवड्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जारी, कृषीमंत्री कोकाटे यांची माहिती
- गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा साखर उत्पादनात २७ पूर्णांक ६८ लाख मेट्रिक टन घट, पुणे साखर आयुक्तालयाकडून आकडेवारी जारी
- भारतीय जनता पक्षाचा ४५वा स्थापना दिवस विविध कार्यक्रमांनी साजरा

आणि

- देशभरात रामनवमी उत्साहात साजरी

****

गेल्या दहा वर्षात केंद्र सरकारनं पायाभूत सुविधांसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद सहा पटीनं वाढवल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. तामिळनाडूत रामेश्वरम इथं, समुद्रावर बांधलेला भारतातला पहिला व्हर्टीकल लिफ्ट म्हणजेच उभा वर उचलला जाणाऱ्या पंबन रेल्वे पुलाच्या उद्घाटनासह, विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी काल पंतप्रधानांच्या हस्ते झाली, त्यानंतर आयोजित जाहिर सभेला ते संबोधित करत होते. देशात पायाभूत सुविधांचं वेगानं काम होत असून, गेल्या दहा वर्षात भारतानं आपली अर्थव्यवस्था दुपटीनं वाढवली असल्याचंही पंतप्रधानांनी नमूद केलं. मुंबईतल्या अटल सेतूसह देशभरात उभारलेल्या पुलांचा त्यांनी यावेळी दाखला दिला, तसंच विविध रेल्वे प्रकल्पांची माहिती दिली.

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

पंबन रेल्वे पुलाच्या उभारणीसाठी साडेपाचशे कोटी रुपयांचा खर्च आला असून, सांध्याचं जोडणीतंत्र वापरून हा पुल उभारला आहे. या नवा रेल्वेपुलामुळे रामेश्वरमची चेन्नईसोबतची दळणवळणीय जोडणी सुधारेल, आणि प्रवासी आणि मालवाहतूकीसह पर्यटन क्षेत्रालाही लाभ होईल, असं पंतप्रधानांनी सांगितलं.

****

राज्यात गेल्या आठवड्यात अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी आणि कृषी अधिकार्यांना दिले असल्याचं, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सांगितलं. नंदुरबार तालुक्यातल्या नुकसानग्रस्त ठाणेपाडा शिवारात कांदाशेतीची पाहणी केल्यानंतर ते काल बोलत होते. या पावसामुळे राज्यातले २४ जिल्हे आणि १०३ तालुके बाधित झाले असून, पंचनामे करुन आठ दिवसात नुकसानीची आकडेवारी कळेल, असं ते म्हणाले. मदतीबाबत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करु, तसंच कांदा पिकाबाबत केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांच्याकडे देखील केंद्राकडून मदत मागण्यासाठी प्रस्ताव पाठवला जाईल, असं कोकाटे यांनी सांगितलं.

****

राज्यात मार्च अखेरच्या ऊस गाळप हंगामाच्या अहवालानुसार, ८० लाख मेट्रिक टन साखर उत्पादन झालं आहे. एकूण २०० पैकी १८९ कारखान्यांची धुराडी ऊस संपल्यानं बंद झाली असून, सध्या केवळ ११ साखर कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम सुरू आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा साखर उत्पादनात २७ पूर्णांक ६८ लाख मेट्रिक टन घट झाल्याचं स्पष्ट झालं आहे. साखरेचं ९२ ते १०४ लाख मेट्रिक टन उत्पादन हाती येण्याची अपेक्षा असल्याचं पुणे साखर आयुक्तालयाकडून सांगण्यात आलं आहे.

****

पंतप्रधान सूर्यघर योजनेअंतर्गत सौर ऊर्जा कार्यान्वित करणारं परभणी इथलं महावितरण मंडळ कार्यालय राज्यातलं पहिलं महावितरण कार्यालय होत आहे. लवकरच याचा शुभारंभ होईल, अशी माहिती मुंबई इथले कार्यकारी संचालक डी. आर. औंढेकर यांनी दिली. या सोलरची पाहणी केल्यानंतर ते काल बोलत होते.

**बाईट – डी. आर. औंढेकर**

****

भारतीय जनता पक्षाचा ४५वा स्थापना दिवस काल विविध कार्यक्रमांनी साजरा झाला. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्ष कार्यकर्त्यांना शुभेच्छा देतांना, देशाच्या प्रगतीसाठी अतुलनीय समर्पणाचा संकल्प करत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्याचं आवाहन केलं.

भाजपचा स्थापना दिन नागपूरमध्ये महाल स्थित टिळक पुतळ्याजवळील भाजपा महानगर कार्यालयाच्या भूमिपूजनाने साजरा झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते.

नांदेडमध्ये भाजप स्थापना दिनानिमित्त महानगर भाजप कार्यालयात खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आलं. धाराशिव इथंही आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि शामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेचं पूजन करून भाजप कार्यालयात ध्वजवंदन करण्यात आलं.

****

श्रीराम जन्मोत्सव अर्थात रामनवमी काल देशभरात उत्साहात, भक्तिभावाने साजरी झाली. यानिमित्त दुपारी १२ वाजता ठिकठिकाणच्या राम मंदीरांसह घरोघरी देखील रामजन्माचा सोहळा साजरा झाला.

अयोध्येतल्या राम मंदिरात काल दुपारी बारा वाजता विशेष किरणोत्सव साजरा करण्यात आला. जगाच्या कानाकोपऱ्यातून अयोध्येत आलेल्या भाविकांवर, ड्रोनच्या सहाय्यानं शरयू नदीतल्या पाण्याचा शिडकावा करण्यात आला. याशिवाय मंदिरात दीपोत्सवही साजरा करण्यात आला.

राज्यातही रामनवमी उत्साहात साजरी झाली. याबाबतचा हा वृत्तांत,

**छत्रपती संभाजीनगर इथं विविध राम मंदिरांमध्ये आरती, शोभायात्रा, महाप्रसाद, कीर्तन आदी कार्यक्रम पार पडले. विविध ठिकाणी झालेल्या गीत रामायण कार्यक्रमांना भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.**

**हिंगोली शहरात काल सकाळी भव्य शोभायात्रा काढण्यात आली, बीड शहरातून दुचाकी फेरीला नागरीकांचा प्रतिसाद मिळाला.**

**जालना शहरासह जिल्ह्यात रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. सायंकाळी शहरातल्या गांधीचमन चौकातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. समर्थ रामदास स्वामींचं जन्मगाव असलेल्या जांबसमर्थ इथल्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.**

**नांदेड इथं श्री रेणुका माता मंदिर इथून शोभायात्रा काढण्यात आली.**

**धाराशिव इथं समर्थ नगर भागातल्या श्रीराम मंदिरात श्रीराम जन्माचा सोहळा मोठ्या भक्तीभावाने पार पडला. यानिमित्ताने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात २९ भाविकांनी रक्तदान केलं.**

**परभणी तसंच लातूर जिल्ह्यातही रामनवमी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरी करण्यात आली.**

**नाशिक इथंही श्री काळराम मंदिरात रामजन्मोत्सव उत्साहात साजरा झाला.**

**शिर्डी इथं श्री साईबाबा मंदिरात श्री रामनवमी उत्सवाच्या मुख्य दिवशी काल अखंड पारायण समाप्तीनंतर श्रींची प्रतिमा, पोथी आणि विणेची मिरवणूक काढण्यात आली. या उत्सवात श्री साईबाबा समाधी शताब्दी स्तंभाच्या ध्वजाचं विधिवत पुजन करुन ध्वज बदलण्यात आला. यानिमित्तानं राज्यभरातून पायी दिंड्या साईनगरीत दाखल झाल्या आहेत.**

**आकाशवाणी बातम्यांसाठी**

**हर्षवर्धन दीक्षित, छत्रपती संभाजी नगर**

****

श्रीराम नवमी आणि संत सेवालाल महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा वाशिम जिल्ह्यातल्या पोहरादेवी इथं साजरा झाला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून या कार्यक्रमाला संबोधित केलं. पोहरादेवी या पवित्र स्थळाच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सवानिमित्त आयोजित 'वाचन सप्ताह'चं उद्घाटन आज होणार आहे. यानिमित्त १४ एप्रिल पर्यंत व्याख्यान, काव्य वाचन, रक्तदान शिबिर, सलग १८ तास वाचन, शाहिरी असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

****

धाराशिव जिल्हा मजूर फेडरेशनच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना महायुतीचा दणदणीत विजय झाला. या निवडणुकीत चार उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत तर उर्वरित नऊ

उमेदवारांसाठी झालेल्या निवडणुकीत काल मतमोजणी झाली. यात आठ जागांवर महायुतीचे, तर एका जागेवर महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आले.

****

परभणी इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाअंतर्गत सेंटर ऑफ अडव्हान्स एंन्डोस्कोपी सिस्टिम चं उद्घाटन काल खासदार संजय जाधव यांच्या हस्ते झालं. जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. नागेश लखमावार, वैद्यकीय महाविद्यालयाचे उप अधिष्ठाता डॉ. राजेंद्र अंकुशे यावेळी उपस्थित होते.

****

नांदेडचं मध्यवर्ती बसस्थानक तात्पुरत्या काळासाठी कौठा मैदानावर स्थानांतरीत करण्यात येत असल्याची माहिती, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली. मध्यवर्ती बसस्थानकाला रेल्वेस्थानकापासून जोडणारा मुख्य रस्ता दुरुस्त करण्यासाठी मर्यादित कालावधीसाठी हा बदल करण्यात आला आहे. या नव्या निर्णयानुसार, १२ एप्रिलपासून जुनं बसस्थानक बंद करण्यात येणार आहे. संबंधित यंत्रणेनं नियोजित वेळेआधीच रस्त्याचं काम पूर्ण करण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

****

मागील दोन दिवसांत बीड जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकर्यांच्या पिकांचं आणि फळबागांचं मोठं नुकसान झालं असून, प्रशासनाने तातडीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आमदार संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री आणि कृषीमंत्र्यांना पत्र लिहिलं.

****

हवामान

कोकणात काल तुरळक ठिकाणी पाऊस झाला. राज्यात सर्वाधिक तापमान चंद्रपूर इथं ४१ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव आणि परभणी इथं सरासरी ३७ अंश, तर छत्रपती संभाजीनगर आणि बीड इथं ३९ अंश सेल्सिअस पेक्षा जास्त कमाल तापमानाची नोंद झाली.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील, असा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

****